## महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा-२०१७
## लेखी परीक्षेच्या निकालाची घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी, घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा, (मुख्य) परीक्षा-२०१७ च्या लेखी परीक्षेचा निकाल **दिनांक २८ डिसेंबर, २०१७** रोजी जाहीर करण्यात आला आहे. लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती मुंबई केंद्रावर घेण्यात येतील. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

**२) प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, लेखी परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात आला आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**३)** अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार विषयांकित गट-ब पदासाठी विहित केलेली खेळविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, अर्ज सादर करण्याच्या म्हणजेच दिनांक २६ एप्रिल,२०१७ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल व संबंधित क्रीडा प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

४) लेखी परीक्षेव्दारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसुचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या Profile मध्ये पाठविलेल्या नमुन्यात (Format) आयोगास Online पध्दतीने Link Openझाल्यापासून आठ दिवसाच्या आत पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहित धरला जाईल. उक्त उल्लेखित Online पध्दतीखेरिज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला पसंतीक्रम ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच याबाबत कोणतीही बाब, निवेदने/ पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

**५)** प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईल पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र.३.८ कृपया पहावी.)

**६)** सदर निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

दिनांक : **२८ डिसेंबर, २०१७**
ठिकाण- मुंबई

**विजया पडते**
**उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**